SPECIAL OFFERS ई-पेपर वेबसाईट बनवा
फक्त २९९९/-
SAVE UP TO 90%
NEWS
9359421909
ONLY THIS WEEK!
ORDER NOW
www.abhibee.com

दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

1,22,570
डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील लोकप्रिय दैनिक

● वर्ष : ०२ ● अंक : ०७६ ● पुणे ● गुरुवार, दि. ३० जानेवारी २०२५ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313



महिलांनी आत्मनिर्भर व्हावे - रेणू भाटीया 3



अतिक्रमणांवर सर्जिकल स्ट्राईक 4

# सिंहगड रोडवर जीबीएसचा पहिला बळी

## ५६ वर्षीय महिलेचा ससूनमध्ये मृत्यू; रुग्णसंख्येत वाढ

- **जीव धोक्यात आहे, पाहणी करा सर्वेक्षण पथकाला नांदेडच्या ग्रामस्थांची हाक**



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

'गुलियन बॅरी सिंड्रोम' (जीबीएस) झालेल्या नांदोशी (सिंहगड रस्ता) येथील 56 वर्षीय महिलेचा ससून रुग्णालयात मंगळवारी सकाळी उपचारादरम्यान मृत्यू झाला. हा शहरातील 'जीबीएस'चा पहिला मृत्यू ठरला. याआधी धायरीतील डीएसके विश्व सोसायटीमधील 40 वर्षीय तरुणाचा सोलापुरातील मार्कंडेय सहकारी रुग्णालयात उपचारादरम्यान 25 जानेवारीला मृत्यू झाला.

आरोग्य विभागाने दिलेल्या माहितीनुसार, मृत्यू झालेल्या महिलेला ताप आला होता. तिला 15 जानेवारीला अशक्तपणा व अर्धांगवायूची लक्षणे काही प्रमाणात जाणवू लागली. उपचारासाठी स्थानिक खासगी रुग्णालयात दाखल केले. तेथून पुढे 17 जानेवारीला ससूनमध्ये पाठवले. तिला पूर्णपणे अर्धांगवायू झाल्याने शरीराची हालचाल होत नव्हती. मंगळवारी श्वसनसंस्था निकामी झाल्याने तसेच फुफ्फुस, श्वासनलिकेला तीव्र संसर्ग झाल्याने मृत्यू झाला. त्या महिलेला मुखाचा कर्करोगही होता, अशी माहिती महापालिकेच्या आरोग्यप्रमुख डॉ. नीना बोराडे यांनी दिली.

'जीबीएस'मुळे गावातील लहान मुलांचा जीव धोक्यात आहे. त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. तुम्ही पाहणी करण्यासाठी आला आहात, तर पाहणी न करताच माघारी फिरू नका, अशी आर्त हाक नांदेडच्या ग्रामस्थांनी केंद्रीय पथकाला बुधवारी घातली.

'जीबीएस'चा उगम झालेल्या नांदेड येथील सार्वजनिक विहिरीची माहिती घेण्यासाठी केंद्रीय एकात्मिक सर्वेक्षण विभागाचे सात सदस्यीय पथक बुधवारी सकाळी साडेअकराच्या सुमारास दाखल झाले. तेथे आधीपासूनच वाट पाहत असलेले माध्यमांचे प्रतिनिधी बघून ते विहिरीकडे न जाताच माघारी फिरले. त्यामुळे माजी सरपंच विजय कोल्हे, गोकूळ करंजावणे, माजी उपसरपंच रूपेश घुले, राहुल घुले, प्रज्योत लगड, अनिल मते आदी स्थानिक रहिवासी त्यांच्या मोटारी जवळ गेले. अधिकारी गाडीतून खाली उतरत नसल्याने ग्रामस्थ रस्त्यावर बसले. त्यानंतर अधिकारी गाडीतून खाली उतरले असता त्यांनी ग्रामस्थ व माध्यमांची संवाद साधला.

### ...म्हणून रात्रीतून साफसफाई

**समिती पाहणी करण्यास येणार असल्याने प्रशासनाने रात्री दोनपर्यंत विहिरीच्या परिसरातील साफसफाई केली. नांदेड फाटा परिसरातील रस्त्यावर गतिरोधक टाकून पांढरे पट्टे मारले. मागील दोन वर्षे जलवाहिनी होत नव्हती, असे ग्रामस्थ अजय दारवटकर यांनी सांगितले.**

### व्हेंटिलेटरवर २० रुग्ण

**पुण्यात बुधवारी नवीन 16 रुग्णांची वाढ झाली. त्यामुळे एकूण रुग्णांचा आकडा 127 वर गेला आहे. सोमवारी रुग्णसंख्या 111 होती, ती मंगळवारी स्थिर राहिली. गेल्या काही दिवसांतील 15 रुग्णांची बुधवारी आरोग्य यंत्रणेकडे नोंद झाली. त्यात एक नवीन रुग्ण आढळला. त्यामुळे बुधवारी एकूण नवीन 16 रुग्ण वाढले. 20 रुग्ण कृत्रिम व्हेंटिलेटरवर असल्याचे राज्याच्या साथरोग विभागाने सांगितले.**

# पुणेकरांना महापालिकेकडुन दिलासा

## यंदा मिळकतकरात वाढ होणार नाही

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

वाढत्या महागाईचे चटके सोसणाऱ्या पुणेकरांना महापालिकेकडुन चालु आर्थिक वर्षात मिळकतकरात कोणत्याही स्वरुपाची वाढ केली जाणार नसल्याने चांगलाच दिलासा मिळणार आहे. २०२५-२६ या वर्षासाठी महापालिका मिळकतकरामध्ये वाढ करणार नसल्याचा प्रस्ताव स्थायी समितीसमोर ठेवण्यात आला आहे.

महापालिका प्रशासनाकडुन मागील नऊ वर्षांपासुन मिळकतकरामध्ये वाढ करण्यात आलेली नाही. दरम्यान,२०२५-२६ या आर्थिक वर्षाचे अंदाजपत्रक तयार करण्याचे काम महापालिका प्रशासनाकडुन सुरु आहे. त्यामुळे २० फेब्रुवारीपुर्वी करवाढीबाबतचा निर्णय घेणे महापालिका प्रशासनास बंधनकारक आहे. मात्र मागील तीन वर्षांपासुन महापालिकेत प्रशासकराज आहे, महापालिकेची सर्वसाधारण सभा आता अस्तित्वात नाही. करवाढीचा निर्णय हा धोरणात्मक पातळीवरील आहे. अशा वेगवेगळ्या कारणांमुळे महापालिकेच्या कर संकलन विभागाकडुन यावर्षी देखील मिळकतकर वाढ न करण्याबाबतचा प्रस्ताव स्थायी समितीसमोर ठेवण्यात आला आहे. पुणे महापालिकेने 2010-11 मध्ये मिळकत करामध्ये 16 टक्के, 2013-14 मध्ये 6 टक्के तर 2015-16 या आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकात मिळकत करामध्ये 10 टक्के करवाढ केली होती.

पाहिजेत
एस. के. फॅब्रिकेटर्स, कर्वेनगर, पुणे
1) ऑर्गन वेल्डर
2) शीटमेटल फिटर
3) हेल्पर
4) आर्क वेल्डर
5) फिनिशर
6) पॉलिशर
स्किल्ड् लेबर टीम किंवा लेबर सप्लायर्स पाहिजेत
९८८१००८५३२

# पुणे येथील भाविकांचा अपघात; अनेक भाविक जखमी

**तुळजापूर (दै. आरंभ पर्व)**

तुळजाभवानी मातेच्या मोफत दर्शनासाठी आलेल्या पुणे येथील भाविकांचा अपघात बुधवारी ता. 29 सायंकाळी सहा वाजण्याच्या सुमारास घडला. सोलापूर-तुळजापूर रस्त्यावरील घाटात सदरची दुर्घटना घडली. उपजिल्हा रुग्णालयाच्या सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार तसेच घटनास्थळावरून आणि पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार ट्रॅव्हल्स क्रमांक पीक्यु 0666 असा ट्रॅव्हल्सचा क्रमांक आहे. तुळजाभवानी मातेचे दर्शन घेतल्यानंतर सदरची ट्रॅव्हल्स सोलापूरकडे जाताना कलंडली. त्यामध्ये रेखा गणपत ओव्हाळ (वय 55) ही महिला ठार झाली आहे. तसेच काही जखमींना धाराशिव येथील जिल्हा रुग्णालयात पाठविण्यात आलेले आहे.



त्यांची नावे पुढीलप्रमाणे शांताबाई बोराटे, चंदा शिंदे, विनया साबळे, सुजित बोळे, विहान शिंदे, भावना नायपले, उशा शिंदे, लक्ष्मी धोत्रे, राणी फडतरे, आशा रामकुटे, भारती सस्ते, राधाबाई पलंगलाड, मंदाकिनी म्हेत्रे, सुरेन अल्लाट, सुशीला बोराटे, सुरेखा कुटे (वय-60), कल्पना शेळके (वय-65), सुमन कुटे (वय-68), सारिका बोराटे (वय-39) यांना धाराशिव येथे पुढील उपचारासाठी हलविण्यात आलेले आहे.

## ठळक बातम्या

### चक्क मनीमाऊचे सिझेरियन बाळंतपण

**जुन्नर : (आरंभ पर्व) पाळीव प्राणी आणि मानव यांच्यात एक खास संबंध असतो. या संबंधामुळेच पाळीव प्राण्यांची माणसाकडूनही विशेष काळजी घेतली जाते. अशीच एक घटना नुकतीच जुन्नरमध्ये घडली. गरोदर असलेल्या पाळीव मांजरीचे चक्क सिझेरियन बाळंतपण करून दोन पिल्लांसह या मांजरीला जीवदान मिळाले आहे. एका मनीमाऊच्या सिझेरियनची ही गोष्ट परिसरात चर्चेचा विषय झाली आहे. बोडकेनगर (ता. जुन्नर) येथे राहणाऱ्या गणेश व लता बेळे या दांपत्याने एक मांजर पाळली आहे. या मांजर गर्भवती होती. दरम्यान, पिल्लांना जन्म देण्यात त्रास होत असल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यांच्या पाळीव मांजरीचे हे तिसरे बाळंतपण होते. सायंकाळी प्रसववेदना सुरू झाल्यानंतर मनीमाऊ रात्रभर वेदनेने तळमळत होती. बाळंतपण होत नव्हते. तिला होणारा त्रास पाहून बेळे यांनी सकाळी पशुवैद्यकीय डॉक्टरांना घरी बोलविले. पशुवैद्यकीय डॉक्टरांकडून मांजरीची तपासणी केली. यावेळी डॉक्टरांनी पिल्लू पोटात मृत झाले असून, मांजरीचे सिझेरियन करणे गरजेचे असल्याचा सल्ला दिला. बेळे यांनी डॉक्टरांना मांजरीला वाचविण्याची विनंती केली. डॉक्टरांनी मांजर शंभर टक्के वाचेल, अशी खात्री दिल्यानंतर बेळे यांनी मांजरीच्या सिझेरियन प्रसूतीला परवानगी दिली. डॉ. सागर परदेशी, डॉ. बाळकृष्ण मुखेकर, डॉ. चांगदेव पथवे व डॉ. साहिल ताम्हाणे या चार डॉक्टरांच्या पथकाने मांजराला भूल देऊन सिझेरियन बाळंतपण केले.**

दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
WE ARE HIRING !
Open Position
VIDEO EDITOR
आपला बायोडाटा खालील ईमेलवर पाठवावा.
for Video Editor असा स्पष्ट उल्लेख करावा.
aparvinfo@gmail.com & ganganepratik4@gmail.com

Call Now ७२७६३१४१४२

दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
वार्ताहर नेमणे आहे
पुणे आणि जिल्ह्यात लोकप्रिय दै.आरंभ पर्वसाठी खालीलप्रमाणे जिल्हा व तालुकास्तरावर वार्ताहर नेमणे आहेत.
सिंहगड रोड भागातील जनतेचा आवाज.. इथं आहे जनहिताचे सर्व आरंभपर्व
पुणे जिल्हा
इंदापूर शहर, इंदापूर ग्रामीण, बारामती, उरुळी कांचन, यवत, केडगाव, सुपा, भिगवण, सासवड, पुरंदर,जेजुरी, नीरा, सोमेश्वर, माळेगाव, भोर, वेल्हा. चाकण, राजगुरूनगर, मंचर, जुन्नर, घोडेगाव, लोणी काळभोर
पुणे शहर
धायरी, स्वारगेट, हडपसर, कॅम्प, वडगाव बुद्रुक, पर्वती, डेक्कन, सिंहगड रोड, कात्रज, कोंढवा
इच्छुकांनी आपला बायोडाटा खालील ई-मेल वर पाठवावा.
aparvinfo@gmail.com
वार्ताहरांना मिळणाऱ्या सुविधा
आयडीकार्ड, नियुक्तीपत्र, युट्युबसाठी लागणारा माईक
(टीप - वरील गोष्टी देण्यापूर्वी किमान एक महिने काम करणे आवश्यक. आपले काम बघून पुढील निर्णय घेतला जाईल.)
दै.आरंभपर्व मीडिया समूह 7276314142 / 9284559577 / 8605284272



# जनतेने नाकारले तरी गद्दार, दगाबाज जप चालूच...

शिवसेनाप्रमुखांचा २३ जानेवारीला जन्मदिवस साजरा करणारे मुंबईत दोन मोठे मेळावे झाले. उद्धव ठाकरे यांच्या उबाठा सेनेचा अंधेरीच्या क्रीडा संकुलात, तर एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचा बीकेसीच्या मैदानावर संपन्न झाला. दोन्ही मेळाव्यात भगवे झेंडे फडकत होते. शिवसेनाप्रमुखांच्या विचारांचे सच्चे वारस आम्हीच आहोत असे एकनाथ शिंदे यांनी ठणकावून सांगितले, तर आम्ही हिंदुत्व सोडलेले नाही असे उद्धव ठाकरे यांनी वारंवार बजावले. शिवसेनाप्रमुखांच्या हयातीनंतर पक्षाची दोन शकले पडली. पक्ष दुभंगला गेला. शिवसेनाप्रमुखांचा पुत्र स्वत: मुख्यमंत्री असताना पक्षात मोठा उठाव झाला. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेला निवडणूक आयोगाने मान्यता दिली. शिवसेना हे नाव आणि धनुष्यबाण हे चिन्हही दिले. विधानसभा निवडणुकीत शिंदे यांच्या पक्षाचे जनतेने ६० आमदार निवडून देऊन त्यांच्या नेतृत्वावर व त्यांच्या पक्षावर विश्वास दाखवला. उद्धव ठाकरे यांच्या डोळ्यांदेखत व दिवसाढवळ्या एकनाथ शिंदे यांनी शिवसेना पक्षावर कब्जा मिळवला. विधानसभा व लोकसभा निवडणुकीतही मतदारांनी शिंदे यांच्या पक्षावर शिवसेना म्हणून शिक्कामोर्तब केले. जून २०२२ मध्ये पक्षात झालेल्या उठावानंतर महाआघाडी सरकारने बहुमत गमावल्याने उद्धव यांना मुख्यमंत्रीपदावरून पायउतार व्हावे लागले. मुळात २०१९ च्या विधानसभा निवडणुकीनंतर त्यांनी स्वत: सत्तेचे पद स्वीकारलेच कशाला? शिवसेनाप्रमुखांनी स्वत: कोणतेही सत्तेचे पद आयुष्यात घेतले नाही, पक्षातील इतरांना नेहमी मोठे केले. त्यांनी मनोहर जोशी व नारायण राणे हे दोन मुख्यमंत्री दिले, राज्यात व केंद्रात तीन-चार डझन मंत्री केले, लोकसभेचे प्रतिष्ठेचे अध्यक्षपद पक्षातील नेत्याला म्हणजे मनोहर जोशींना दिले. त्यांनी नेहमी आपले सहकारी व सामान्य शिवसैनिकांना मोठे केले म्हणूनच त्यांचे मोठेपण कायम राहिले.

शिवसेनाप्रमुखांनी काँग्रेसला राजकीय शत्रू नंबर १ मानले होते. एकवेळ शिवसेना बंद करीन पण काँग्रेसबरोबर जाणार नाही, असे ठणकावून म्हटले होते. मग उद्धव यांनी सन २०१९ मध्ये काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसशी हातमिळवणी करून मुख्यमंत्रीपद स्वीकारलेच कशाला? लोकसभा निवडणुकीत सात ते आठ खासदार निवडून आले म्हणून पुन्हा आपण सत्तेवर येणार या भ्रमात ठाकरे परिवार होता. प्रत्यक्षात विधानसभा निवडणुकीत या भ्रमाचा भोपळा फुटला आणि पुन्हा काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (शप) बरोबर फरफटत जाण्याची पाळी उबाठा सेनेवर आली. दोन महिन्यांपूर्वी झालेल्या विधानसभा निवडणुकीत आपल्याला जनतेने का नाकारले याचे खरे तर उबाठा सेनेने आत्मचिंतन करायला हवे. शिवसेनाप्रमुखांच्या जन्मदिनानिमित्त झालेल्या मेळाव्यात आत्मचिंतन होईल अशी अपेक्षा होती. शिवसैनिकांना संघटनेचा कार्यक्रम दिला जाईल असे वाटले होते. डळमळीत झालेली संघटना बांधणीविषयी उद्धव बोलतील असे वाटले होते. प्रत्यक्षात केंद्रीय गृहमंत्री अमित शहा व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर तोंडसुख घेण्यातच पक्षप्रमुखांचा भाषणातून भर दिसला. अमित शहांचा आपण समाचार घेणार, त्यांना सोडणार नाही, अशी निर्वाणीची भाषा वापरून पक्षाला काय लाभ होणार आहे? यापुढे सूड सूड आणि सूड घ्यायचा आहे असे त्यांनी पक्षाच्या कार्यकर्त्यांना बजावले. एक तू तरी राहशील किंवा मी राहीन, अशी धमकी देणारे आव्हान त्यांनी देवेंद्र फडणवीस यांना यापूर्वी दिले होते. महाराष्ट्राच्या राजकारणात अशी भाषा कोणी वापरली नव्हती. त्यातून उद्धव व त्यांच्या पक्षाला काय साध्य झाले? लोकसभा निवडणुकीत महाआघाडीला महायुतीपेक्षा जास्त यश मिळाले तेव्हा सर्व ईव्हीएमसह सर्व काही व्यवस्थित व सुरळीत होते, विधानसभा निवडणुकीत आपला पराभव झाला व भाजपाला भरोघोस यश मिळाले म्हणून त्यांना अमित शहा एकदम कट्टर शत्रू वाटू लागले.

अमित शहा हे देशाचे गृहमंत्री आहेत हे विसरून त्यांचा अहम्मद शहा अब्दाली म्हणून वारंवार उल्लेख करणे हे महाराष्ट्राच्या संस्कृतीला शोभते का? अंगावर आलात तर वळ घेऊन दिल्लीला परत जाल या धमकीचा अर्थ काय होतो? ही धमकी ऐकून अमित शहा यांनी कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नसली तरी ते शांत बसतील असे वाटते काय? ठाकरे यांनी आपण हिंदुत्ववादी आहोत हे सांगण्यासाठी लोकसभा निवडणुकीत मुंबईतील चिता कॅम्पमध्ये झालेल्या प्रचारसभेचे उदाहरण दिले, याची मोठी गंमत वाटली. उबाठा सेनेचे उमेदवार अनिल देसाई हे खासदार म्हणून निवडून आले. त्यांच्या विजयात मुस्लीम व्होट बँकेचा मोठा वाटा होता. निवडणूक प्रचारात चिता कॅम्पमध्ये ठाकरेंची सभा झाली. सभेला गर्दी मोठी होती व त्यात ९० टक्के मुस्लीम होते, असे स्वत: ठाकरेंनी सांगितले. ठाकरे यांनी सभेत विचारले, मी हिंदुत्व सोडले आहे असे तुम्हाला वाटते का? यावर सभेतून नकारार्थी उत्तर मिळाले. नंतर त्यांनी विचारले, माझे हिंदुत्व आपल्याला मान्य आहे का, याच सभेतील गर्दीने उत्तर होकारार्थी दिले. हे उदाहरण सांगून ठाकरे आपण हिंदुत्ववादी आहोत व त्यावर मुस्लीम मतदारांनी शिक्कामोर्तब केले असे सांगत आहेत. हिंदूंपेक्षा मुस्लीम मतदार त्यांना साक्षीदार म्हणून अधिक जवळचे वाटू लागले आहेत का? एकनाथ शिंदे यांच्याविषयी ठाकरे यांचा राग कायम आहे. शिंदेंनी शिवसेना पळवली हे विसरू शकत नाहीत. सरकार स्थापनेच्या वेळी, मंत्रिमंडळ विस्ताराच्या वेळी किंवा पालकमंत्री ठरवले जात असताना एकनाथ शिंदे हे सातारा येथील त्यांच्या दरे गावी निघून गेले होते. नव्या सरकारच्या स्थापनेत शिंदे यांच्या मनासारखे घडले नाही म्हणून ते गावी निघून गेले अशा बातम्याही झळकल्या. त्यावर ठाकरे यांनी रुसू बाई रुसू, (कोपऱ्यात बसू) गावी जाऊन बसू अशी टिंगल उडवली. बाबरी मशीद पडल्यानंतर १९९२-९३ मध्ये जे घडले त्याबद्दल आपण कधीही माफी मागितली नाही, उलट तेव्हा भाजपाने आम्ही नाही त्यातले, अशी भूमिका घेतली होती, असाही ठाकरे यांनी सूर आळवला. भाजपापेक्षा आपण हिंदुत्ववादी आहोत हेच त्यांना ठसवायचे असावे. जखमी वाघ काय असतो व त्याचा पंजा काय करतो हे भविष्यात दिसेल, ते (शिंदे गट) म्हणजे राजकारणातले बाटगे आहेत, त्यांच्या हाती चाबूक देऊन ते महाराष्ट्राच्या अस्मितेचा वध करायला निघालेत, विकली गेली ती विष्ठा, निष्ठा माझ्यासोबत आहे. पक्षप्रमुखांच्या तोंडी तीच तीच भाषा गेली अडीच वर्षे ऐकायला मिळत आहे. जमलेल्या माझ्या तमाम हिंदू बांधवांनो व भगिनींनो व मातांनो अशी पक्षप्रमुखांनी भाषणाला सुरुवात केली पण निवडणूक काळात आपण देशभक्त बांधवांनो व भगिनींनो असे म्हणत होतो, याचीही कबुली दिली. मोदींच्या अश्वमेधाला गाढव म्हणण्यापर्यंत त्यांची मजल गेली. पण ठाकरे यांना सत्ता गमावून घरी बसण्याची पाळी आली व मोदींनी विजयाची व पंतप्रधानपदाची हॅटट्रीक केली, तसेच पुन्हा येईन म्हणणारे देवेंद्र फडणवीसच पुन्हा राज्याचे मुख्यमंत्री झाले. एकनाथ शिंदे यांच्या बंडापासून दरवर्षी विजयादशमीला शिवसेनेचे दोन मेळावे मुंबईत होऊ लागले आहेत. दोन्हीकडे फलकांवर आणि व्यासपीठावर शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांची मोठी प्रतिमा असते. शिंदे यांच्या फलकांवर धर्मवीर आनंद दिघेही दिसतात. आता शिवसेनाप्रमुखांच्या जन्मदिनालाही शिवसेनेचे दोन स्वतंत्र मेळावे मुंबईत होऊ लागले आहेत. ठाकरे यांच्या भाषणात संताप व चिडचिड दिसते, तर शिंदे यांचे भाषण संयमी व शांत असते. शिंदेंच्या भाषणात त्यांच्या कामगिरीचा लेखाजोखा असतो व मोदी-शहांच्या नेतृत्वाविषयी आदर व्यक्त होताना दिसतो, तर ठाकरेंच्या भाषणात भाजपा, मोदी, शहा यांच्यावर संताप व्यक्त होताना दिसतो.

शिवसेनाप्रमुखांचा विचार आपण जपला म्हणून आपल्याला विधानसभा निवडणुकीत दणदणीत विजय मिळाला, अडीच वर्षांपूर्वी केलेल्या उठावानंतर मिळालेला विजय अभिमानास्पद आहे असे सांगताना शिंदे हे खुल्या मनाने कार्यकर्त्यांना श्रेय देतात. मायबाप जनतेपुढे नतमस्तक होतात. आज शिवसेनाप्रमुख असते, तर त्यांनी आपली पाठ थोपटली असती असे आवर्जून सांगतात. आज आपण डीसीएम (डेप्युटी सीएम) आहोत म्हणजे डेडिकेटेड टू कॉमन मॅन असे ते नम्रपणे सांगतात. शिंदे यांनी शिवसैनिकांना ग्रामसभा ते महापालिका हे लक्ष्य असल्याचा कार्यक्रम दिला आहे.

## पुण्यातील प्राइम घरांच्या किंमतीत २०२४ मध्ये १६% वाढ

- लक्झरी घरांच्या मागणीमुळे वाढीस चालना
- मालमत्तेच्या किंमतीत सर्वाधिक वाढ NCR हाऊसिंग मार्केटमध्ये; गेल्या वर्षाच्या तुलनेत हे दर 49% वाढले


**पुणे (दै. आरंभ पर्व)**

गेल्या वर्षात पुण्याच्या निवासी मालमत्ता बाजारपेठेत मालमत्तेच्या सरासरी मूल्यात 16% इतकी लक्षणीय वाढ झाली आहे, ज्याचे कारण, PropTiger.com यांच्या एका नवीन रिपोर्टनुसार, बांधकामाचे साहित्य आणि मजुरी यांच्या वाढत्या किंमतींच्या पार्श्वभूमीवर लक्झरी घरांची सतत वाढती मागणी हे आहे. रिअल इनसाइट: रेसिडेन्शियल ॲन्युअल राऊंडअप 2024 या अलीकडच्या रिपोर्टमध्ये असे निदर्शनास आले आहे की, 2024 च्या ऑक्टोबर-डिसेंबर या कालावधीत पुण्यासहित देशातील मोठ्या शहरांतील मालमत्तेच्या किंमती वाढण्याचा ट्रेंड चालू राहिला आहे, ज्यामधून दर्जेदार घरांची वाढती मागणी प्रतिबिंबित होते.

PropTiger.com च्या 'रिअल इनसाइट: रेसिडेन्शियल ॲन्युअल राऊंडअप 2024' नामक रिपोर्टनुसार, 2024 च्या ऑक्टोबर-डिसेंबर या कालावधीत विविध शहरांतील मालमत्तेच्या किंमती वेगवेगळ्या प्रमाणात वाढल्या आहेत. हैदराबाद या दक्षिण भारतीय निवासी मार्केटमध्ये जवळजवळ मागील दशकभर किंमती जबरदस्त वाढत होत्या. ही वाढ आता मंदावली आहे, पण विश्लेषणासाठी विचारात घेतलेल्या इतर सर्व शहरांत वार्षिक वाढ दुहेरी अंकात झाल्याचे दिसून येत आहे.

प्रस्तुत विश्लेषणात जी हाऊसिंग मार्केट समाविष्ट करण्यात आली आहेत, ती आहेत- अहमदाबाद, बंगळूर, चेन्नई, हैदराबाद, कोलकाता, दिल्ली-NCR (गुरुग्राम, नोयडा, ग्रेटर नोयडा, गाझियाबाद आणि फरीदाबाद), मुंबई महानगर प्रदेश (मुंबई, नवी मुंबई आणि ठाणे) आणि पुणे.

## यशवंत सहकारी साखर कारखान्याच्या जमिनी संदर्भात सकारात्मक चर्चा



**सद्यस्थितीत यशवंत कारखाना बंद असल्याने त्याची यंत्रसामग्री खराब झालेली आहे. बँका व कामगारांची देणी द्यावयची आहेत. तसेच कारखाना सुरु करण्यासाठी कोट्यवधी रुपयांची गरज लागणार असून, त्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न सुरु आहेत. राष्ट्रीय सहकारी विकास निगमकडून (एनसीडीसी) मदत मिळविण्याचे काम देखील सुरु आहे. त्याचबरोबर बँकेकडून कर्ज अथवा कारखान्याच्या जागेची विक्री करून तो सुरु करण्यासाठी चाचपणी केली जात आहे. यासाठी आज बैठक घेण्यात आली त्यामध्ये सकारात्मक चर्चा होऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस , उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्याशी जमिनीच्या रेट संदर्भात चर्चा करुन निर्णय घेण्यात येणार असल्याचे कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती दिलीप काळभोर यांनी सांगितले.**

**लोणी काळभोर (दै. आरंभ पर्व)**

आज पुणे कृषी उत्पन्न बाजार समिती येथे बाजार समितीचे सभापती ,उपसभापती ,संचालक बाजार समितीचे सचिव राजाराम धोंडकर तसेच यशवंत सहकारी साखर कारखानाचे चेअरमन व व्हाईस चेअरमन ,संचालक व कार्यकारी संचालक कैलास झरे यांच्या मध्ये बैठक होऊन सकारात्मक तोडगा निघाला असल्याचे बाजार समितीचे सभापती दिलीप काळभोर यांनी सांगितले.

गेल्या १३ वर्षांपासून बंद असलेल्या थेऊर (ता.हवेली) येथील यशवंत सहकारी साखर कारखान्याच्या मालकीची ९९.२७ एकर जमीन खरेदी करण्याचा प्रस्ताव पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीने पणन संचालकांकडे दिला आहे.

पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या उपबाजार आवारासाठी जमीन खरेदी करण्याकरिता महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनयमन) अधिनियम १९६३ मधील कलम १२ (१) नुसार मंजुरी मिळण्यासाठीचा प्रस्ताव १८ नोव्हेंबरला पणन संचालनालयास दिलेला आहे. सध्या शेतकऱ्यांना व बाजार घटकांना सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीस जागेची आवश्यकता आहे.

त्यामुळे बाजार समितीने शिवाजीराव भोसले सहकारी बँकेकडून मौजे कोरेगांव मूळ (ता. हवेली, जि. पुणे) येथील १२ एकर जमीन ५३ कोटी १७ लाख ८८ हजार ७०४ रुपयांना ७ ऑक्टोबर २०२२ रोजी खरेदी केलेली आहे.

खरेदी केलेल्या जमिनीला जिल्हा उपनिबंधक (ग्रामीण) यांनी ५ जुलै २०२४ रोजीच्या अधिसूचनेन्वये दुय्यम उपबाजार आवार घोषित केलेला आहे. त्यातच थेऊरमधील जागा खरेदीसाठी निधी उपलब्धता व्हावी म्हणून कोरेगाव मूळ येथील उपबाजाराची जागा जाहीर लिलावाने पणन संचालकांच्या कलम १२ (१) अन्वये परवानगी घेऊन विक्री करणे. तसेच राष्ट्रीयकृत बँकांकडून कर्ज घेऊन यशवंत सहकारी साखर कारखान्याची जमीन खरेदी करण्याबाबतचा निर्णय बाजार समितीने बहुमताने घेतल्याचे प्रस्तावात नमूद केले आहे.

यशवंत कारखान्याच्या संचालक मंडळाने कारखान्याची देणी देणे व भांडवल उभारणीसाठी स्वमालकीची ९९.२७ एकर जमीन विक्री करण्याचा प्रस्ताव पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीस ३० ऑक्टोबर २०२४ रोजी दिला होता.

## थोडक्यात



### डॉ. वृषाली भोसले यांची पहिल्या महिला अध्यक्षपदी नियुक्ती

**पुणे (आरंभ पर्व) : नवी दिल्ली येथील जवाहरलाल नेहरू हॉकी टूर्नामेंट सोसायटीच्या (जेएनएचटीएस) अध्यक्षपदी डॉ. (सौ.) वृषाली भोसले यांची नियुक्ती करण्यात आली आहे. नुकत्याच झालेल्या सोसायटीच्या एका विशेष बैठकीत एकमताने हा निर्णय घेण्यात आला. 1964 मध्ये स्थापन झाल्यापासून भारतात हॉकीला चालना देण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावणाऱ्या या प्रतिष्ठित संस्थेचे नेतृत्व करणाऱ्या त्या पहिल्या महिला अध्यक्ष ठरल्या आहेत. वैयक्तिक कारणास्तव पायउतार झालेले उद्योगपती यश भारवानी यांच्या पश्चात डॉ. भोसले अध्यक्षपदाची धुरा सांभाळतील. यापूर्वी, ए. के. सेन, वाय. बी. चव्हाण, शरद पवार आणि काही ऑलिम्पियन दिग्गजांनी हे अध्यक्षपद भूषवले आहे. डॉ. भोसले म्हणाले, "नवी दिल्ली येथील जवाहरलाल नेहरू हॉकी सोसायटीची नवनिर्वाचित अध्यक्ष या नात्याने तुमच्यासमोर उभे राहणे हा माझा मोठा सन्मान समजते. हा क्षण केवळ वैयक्तिक मैलाचा दगड नाही तर भारतीय क्रीडा प्रशासनातील समावेशकता आणि प्रतिनिधित्वासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे.**


## जगाला चिरंतन प्रेरणा देणाऱ्या गांधीजींचा शोध : 'महात्मा गांधी आणि जग'



● प्रा.डॉ.सुभाष वाघमारे ●
मराठी विभाग प्रमुख,
छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा
९८९०७२६४४०

**(दै. आरंभ पर्व)**

भारतासारख्या लोकशाही देशात आज हिंसा मोठ्या प्रमाणावर होत आहेत. देशातील अनेक नेत्यांचे वर्तन बिघडले आहे. खोटेपणा,मुजोरपणा ,फसवणूक ,अत्याचार, अहंभावना ,सरकारी संपत्तीची लुट, स्त्री वर होणारे अत्याचार, ढोंगीपणा,धार्मिक उन्माद, दंगली, अपहरण ,हिंसक हत्यारांचा होणारा वापर, बुवाबाजी,निवडणुकीतील अनैतिकता ,प्रलोभनानी केलेला नैतिक ऱ्हास इत्यादीमुळे वातावरण गढूळ झालेले आहे. अशावेळी आजही गांधीजी यांच्या विचार व आचार यांची देशाला गरज जाणवत आहे. भारतातील गौतम बुद्ध ,महात्मा गांधी यांचे अहिंसा विचार आजच्या काळात आवश्यक आहेत. कायद्याचे राज्य चालवण्याची जबाबदारी घेतलेले लोक हेच जर आपल्याच लोकांचे शोषण करून वर धाक दाखवून नेते होत असतील तर परिस्थिती गंभीर आहे. संवाद व्यवहार हा विचाराने झाला पाहिजे पण विचाराऐवजी हत्यार दाखवून इतरांचे अभिव्यक्ती स्वातंत्र्य दाबून टाकण्याचा प्रयत्न देशातील अनेक घटनात झालेला आहे. या पार्श्वभूमीवर देशात आदर्श मुले ,आदर्श तरुण,लोकशाही मुल्यांचा आदर करणारे व जबाबदारी घेऊन देश चालविणारे तरुण घडविण्याची आवश्यकता जास्त प्रमाणात जाणवत आहे. अशा वेळी शाळा महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या या मुलांना आपला अहिंसेचा वारसा ,लोकशाहीचा वारसा,सहिष्णुतेचा वारसा, बुद्धीप्रामाण्यवादी,वारसा



आवर्जून शिकविण्याची गरज आहे. ज्यांच्या नैतिक व अहिंसावादी चळवळीने देशाला स्वातंत्र्य मिळाले अशा महात्मा गांधी यांना अनेकदा इथल्या धर्मांध प्रवृत्तीने दूर करण्याचा प्रयत्न केला तरी गांधीजी मरत नाहीत,मरणार नाहीत. गांधीजींच्या विचारात माणसे जोडण्याची,हिटलरी प्रवृत्तीविरुद्ध अहिंसा मार्गाने एकत्र येऊन न्यायासाठी स्वातंत्र्यासाठी सत्याग्रह करण्याची, आपले आचरण चांगले ठेवण्याची ,खेड्यातील उद्योगी संस्कृतीला किंमत देण्याची, आपल्या मातीचा आदर करण्याची, जी शक्ती आहे ते त्यांचे वेगळेपण आहे. संस्कृती जतनात 'ईश्वर जन जो तेणे कहिये जो पीड.पराई जाने रे' हे आवश्यक आहे. ईश्वराचे खोटे स्तोम निर्माण करून वाद निर्माण करण्यापेक्षा गांधीजी हिंसक गोष्टींना विरोध करतात. आज कट्टा ,घोडा ,पिस्तुले ,आणि खून हे भारतातील माध्यमांची चर्चा झाली आहे. अहिंसा विचार घेऊन सुख समाधानाने रहावे .एकमेकाला सुख द्यावे असे शिकविणाऱ्या या देशात उन्माद संस्कृती पिढ्या बिघडवत आहेत. या पार्श्वभूमीवर स्वातंत्र्य मिळाले तरी गांधीजींनी सत्तेची कोणतेही पदे न स्वीकारता जे अहिंसा,एकोपा देशाला आवश्यक आहे.हे आयुष्यभर सांगितले. केवळ भारताचे नेते नाहीत तर जगातल्या अनेक नेत्यांची प्रेरणा आहेत,ती का आहेत, हे समजून घेण्याची गरज आहे. त्यामुळेच गांधीजी यांची जगभरात काय ख्याती होती, गांधीजींनी अनेकांची मने चांगुलपणाकडे कशी नेली, देश फुटत असताना देखील हिंदू मुस्लीम ऐक्य यासाठी कसे प्रयत्न केले, कृष्णवर्णीय लोकांच्यावर होणारे अत्याचार ,व त्यांचे राज्यकर्त्यांचे अमानवी कायदे स्वातंत्र्य कसे हिरावून घेतात ,शेवटच्या माणसापर्यंत स्वातंत्र्याचा प्रकाश पोचला पाहिजे हा विचार जगात कसा पोचला हे शोधून देणारे एक पुस्तक गांधीवादी उल्हासदादा पवार यांनी लिहिलेले आहे 'महात्मा गांधी आणि जग. हा ग्रंथ पुणे येथील तनया -ईशां प्रकाशन पुणे यानी ८ ऑगस्ट २०२२ रोजी प्रकाशित केला आहे. सदर ग्रंथ १४० पेजेसचा असून आर्ट पेपरवर रंगीत छपाई करण्यात आलेली आहे. ग्रंथाचे मुखपृष्ठावर गांधीजी यांचा हसरा असा चांगला फोटो घेतलेला आहे. सदर ग्रंथ वाचल्यानंतर जाणवले की ग्रंथशीर्षक सार्थ ठरवणारा असा हा ग्रंथ आहे.

महात्मा गांधीजी यांचा प्रभाव जगभरात कसा पडलेला आहे याची उपयुक्त माहिती देणारा हा ग्रंथ असून आवश्यक तेथे सचित्र फोटो घेतलेले आहेत. सदर ग्रंथ देशाच्या स्वातंत्र्यासाठी योगदान देणाऱ्या स्वातंत्र्य सैनिकांना समर्पित करण्यात आलेला आहे. जेष्ठ गांधीवादी विचारवंत उल्हासदादा पवार हे लेखक असल्याने त्यांनी जगभरातील गांधीजी यांचा प्रभावाचे शोधन केले आहे. महात्मा गांधी यांचे जीवनातील महत्वाच्या घडामोडीशी निगडीत चिंतन ,त्यांच्या जीवनाशी निगडीत अनेक संदर्भांची अतिशय सोप्या व ओघवत्या भाषेत मांडणी केल्याने वाचकांना खिळवून ठेवत,जिज्ञासा तृप्त करीत अगदी अखेरच्या पानापर्यंत वाचावासा वाटणारा हा ग्रंथ आहे. महात्मा गांधी एक नीतिमान,शांतीप्रिय तरीही ,स्वातंत्र्याचे हक्क सर्वांना मिळावेत म्हणून अहिंसेच्या मार्गाने सत्याग्रह करणारे नेते होते. त्यांचा विचार गौतम बुद्ध यांच्याप्रमाणेच जगाच्या हितासाठी आवश्यक आहे. म्हणूनच गांधीजी यांचा मूल्य विचार जगातील अनेक देशांनी स्वीकारला.त्यांचे पुतळे जगभर दिसतात. जगातील सर्व संग्रहालयात गांधीजी यांची नोंद घेतली आहे. अमेरिका,इंग्लंड,जर्मनी,दक्षिण आफ्रिका या देशातील अनेक नेत्यांनी मानवतेसाठी गांधीजी हेच कसे उपयुक्त आहेत हे दाखवून दिले आहे.. या बाबतची जगभरातील माहिती लेखकाने सोप्या भाषेत दिलेली आहे.

या ग्रंथास डॉ.सदानंद मोरे यांची प्रस्तावना या ग्रंथास असल्याने या ग्रंथाची यथोचित ओळख त्यांनी करून दिली आहे. युनोने २ ऑक्टोबर हा गांधी जयंती दिवस हा 'अहिंसा दिवस' म्हणून जाहीर केला. जगातील लेखक,नेते, महिला ,वंचित घटक ,युवा शक्ती, संशोधक ,शिक्षण तज्ञ यांना गांधीजी प्रेरणादायक आहेतच., हो मी चिन्ह ,नेल्सन मंडेला ,मार्टिन ल्युथर किंग ,बराक ओबामा , जोसेफ बायडन हे गांधीजींचे ऋण कसे मान्य करतात, अल्बर्ट आईन स्टाईन ,सर बर्नाड शो,रोमन रोलंड ,यांच्या मनात गांधीजी बद्दल आदर का? महिलांनी देखील सत्याग्रह का करावा, कोणतेही काम वाईट नसते,घरातल्या कामात मदत करणारे गांधी,स्त्री स्वातंत्र्याचा आदर करणारे गांधी, सशस्त्र क्रांतीला विरोध करणारे गांधी,'चले जाव' या दोन शब्दांनी सारा देश जागृत करणारे गांधी, स्वातंत्र्य मिळाले तरी त्याच्या आनंदात मशगुल न होता माणसात सद्भावना राहावी म्हणून प्रयत्न करणारे गांधी, अरुणा आसफ अली यांचे योग्य शब्दांनी मन परिवर्तन करणारे गांधी, देशाला जागतिक पातळीवर दूरदृष्टी देणारे गांधीजी, दोन महायुद्धे झाली तरी अहिंसेचा पुरस्कार करून जगात शास्वत राहिलेले गांधी, जगातील अनेक विद्यापीठात अभ्यासक्रमाचा विषय झालेले गांधी ,आजही दहशतवाद व अफू यांची विक्री करून आतंकवादी अफगानिस्तानसारख्या देशात गांधीजी यांचे गीत गाणारे पाचशे विद्यार्थी, गांधीजी याना गुरु मानणारे,बांगला देश स्वातंत्र्यासाठी लढा देणारे मुजीबर रहमान .जागतिक युवा महोत्सवात युवाशक्तीला भावलेले व्यक्तिमत्व गांधीजी, रशिया आणि चीनसारख्या कम्युनिष्ट देशात पुतळा स्वरुपात उभा असलेले अहिंसक गांधीजी, जगावर ज्यांनी युद्ध लादले अशा इटली आणि जर्मनी या दोन्ही देशांनी आज केलेला गांधीजींच्या अहिंसेचा गौरव,पोस्टाच्या तिकिटात स्टँप रूपाने विविध देशात पोचलेले गांधी, भारतच सदैव अहिंसेचा पुरस्कार करू शकतो या विषयी जगाला वाटणारे अप्रूप, भव्य ग्रंथालयातून गांधीजीच्या ग्रंथाचे होणारे वाचन, गांधीजीच्या कार्याचा जगातील सामान्यातील सामान्य लोकावर झालेला पडलेला प्रभाव, गांधीजींच्या मुळे कृषी,उद्योग या क्षेत्रात जगात झालेले बदल, त्यांचे चारित्र्य ,व्यक्तिमत्व याचा प्रभाव पडून जगातील अनेक नेत्यांनी स्वतः ला 'गांधी' म्हणून घेणे , नोबेल पुरस्कार विजेत्या मलाला युसुफजाई तसेच कैलास सत्यगिरी यांना हिंसाचार विरुद्धच्या लढ्यात अहिंसेचे महत्व पटवून दिल्याने आलेले महत्व, अहिंसेचा अर्थ अजून कळत नसेल पण हिंसेचा अनर्थ कळून चुकलाय या बाबतची मते, इत्यादी एक नव्हे अनेक बाबी या ग्रंथात अतिशय सोप्या शब्दात वाचनीय अशा झाल्या आहेत. म्हणूनच हा ग्रंथ केवळ ग्रंथ नसून गांधीजी यांच्या मुल्य विचारांचे ,नैतिकतेचे ,दृष्टीकोणाचे,आचाराचे,जगावर पडलेले प्रतिबिंब आहे. असा हा ग्रंथ सर्व शिक्षक,सर्व विद्यार्थी ,सर्व पालक ,भारतीय नागरिक यांना उपयुक्त आहे. त्यामुळे किरकोळ एकदोन शब्द काही ठिकाणी शुद्ध स्वरुपात नसले तरी आशय आणि विवेचन या अंगाने पाहता हा ग्रंथ आपले वेगळेपण सिद्ध करतो. जगाला चिरंतन प्रेरणा देणारया महात्मा गांधीजींचा शोध नव्याने 'महात्मा गांधी आणि जग' या ग्रंथात घेतला आहे. गांधीजीपेक्षा धर्मासाठी लढणारे विषमतावादी हेच कसे श्रेष्ठ होते अशी सांगणारी अनेक पुस्तके बाजारात आणून ,किंवा समाजमाध्यमात गांधीजी यांना कमी लेखून,हिंसेचे,भेदाचे तत्वज्ञान पुस्तकात आणून जाणीवेने विद्यार्थ्यांच्या मनात द्वेषबीजे भरणाऱ्या पुस्तकापेक्षा ही अशी पुस्तके भारतीयांना अभिमानास्पद आणि प्रेरणादायी आहेत. कुठे साधे राहून देश जागृत करणारे,सत्य आणि अहिंसा मार्ग घेऊन माणसांचा द्वेष न करता प्रवृत्तीचा द्वेष करणारे निर्मळ गांधीजी आणि कुठे अनैतिक वागून, देशाची जमीन ,धनसंपत्ती आपलीच म्हणून उपभोगणारे, जनतेला धमकवणारे, हुकुमशाही वर्तन करणारे,सतत थापा मारणारे नेते? शील बिघडलेल्या या काळात भारतीयत्व,सहिष्णुता,अहिंसा,साधन शुचिता, स्वातंत्र्य मिळविण्यासाठी देखील नैतिक अहिंसक मार्ग निवडणारे गांधीजी हे देशाचा नव्हे तर जगाचा मानदंड कसे होते, जगाला त्यांच्यापासून काय प्रेरणा मिळाल्यात हे वाचण्यासाठी 'महात्मा गांधी आणि जग' हा ग्रंथ आपल्या प्रत्येकाच्या घरी असायला हवा. सर्वांनी तो वाचायला हवा.

## थोडक्यात



### प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने दिमाखदार ड्रोन शो संपन्न

पुणे (आरंभ पर्व) : सी.ओ.ई.पी. तंत्रज्ञान विद्यापीठाने प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा केला, ज्यामध्ये तंत्रज्ञानातील चमक आणि राष्ट्रीय अभिमान यांचा सुंदर मिलाफ पाहायला मिळाला, ड्रोन शो हे मुख्य आकर्षण होते. सी.ओ.ई.पी. तंत्रज्ञान विद्यापीठाचे कुलपती डॉ. सुनील भिरुड यांनी भारतीय राष्ट्रीय ध्वज फडकवला. डॉ. दयाराम सोनवणे (रजिस्ट्रार), प्राध्यापक, विद्यार्थी, कर्मचारी आणि इतर मान्यवरांचा समावेश होता. यंदाच्या ड्रोन शोचे मुख्य आकर्षण होते भारतीय ध्वजाला पुष्पांजली, ज्यामध्ये एका मॅन्युअली नियंत्रित ड्रोनने ध्वज फडकवल्यानंतर त्वरित ध्वजावर पुष्पांचा वर्षाव केला, जो देशप्रेम आणि अभिमान व्यक्त करणारा होता. त्यानंतर, प्रेक्षकांसाठी पुष्पवृष्टी करणारा एक हेक्साकॉप्टर ड्रोन प्रदर्शित झाला, ज्याने फूलांची रिमझिम वर्षाव केली, जो एकता आणि कृतज्ञतेचा प्रतीक होता. हा कार्यक्रम विद्यापीठाच्या एरियल रोबोट स्टडी सर्कल आणि रोबोट स्टडी सर्कलच्या विद्यार्थ्यांनी, डॉ. एस. एस. ओहोळ यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित केला होता. या ड्रोन शो साठी उपस्थितांनी एरियल रोबोट स्टडी सर्कल आणि रोबोट स्टडी सर्कलच्या विद्यार्थ्यांच्या सृजनशीलते, अचूकते आणि कल्पकतेचे कौतुक केले. हा कार्यक्रम तंत्रज्ञान, अभियांत्रिकी उत्कृष्टता आणि देशभक्तीचा एक परिपूर्ण संगम मानला गेला आणि सी.ओ.ई.पी. च्या आगामी पिढीच्या निर्मात्यांना प्रेरणा देण्याच्या वचनबद्धतेचे एक उत्तम उदाहरण ठरला. संपूर्ण महाराष्ट्रामध्ये सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ ही एकच अशी संस्था आहे ज्या ठिकाणी Robotics & AI यामध्ये पदवी (BTech) आणि पदव्युत्तर (MTech)अभ्यासक्रम अतिशय उत्कृष्टपणे चालविण्यात येतो. रोबोटिक्स क्लबच्या या विद्यार्थ्यांनी अनेक संशोधन निबंध लिहिले आहेत, पेटंट्स मिळविली आहेत. त्याचप्रमाणे विविध राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी केलेली आहे. रोबोकॉन या इंजिनिअरिंगच्या विद्यार्थ्यांमध्ये लोकप्रिय असणाऱ्या रोबोटिक्स स्पर्धेमध्ये राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर उल्लेखनीय कामगिरी देखील केलेली आहे. 2017 मध्ये राष्ट्रीय पातळीवर ही स्पर्धा जिंकून टोकियो, जपान या ठिकाणी आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी भारताचे प्रतिनिधित्व केलेले आहे.

### राममोहन नायडू यांचे शुक्रवारी राष्ट्रीय परिषदेला संबोधन



पुणे (आरंभ पर्व) : दी एरोनॉटिकल सोसायटी ऑफ इंडियातर्फे दोन दिवसीय राष्ट्रीय परिषद आणि ७३ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यात आले आहे. शुक्रवार, दि. ३१ जानेवारी व १ फेब्रुवारी २०२५ या दोन दिवशी डॉ. एपीजे अब्दुल कलाम ऑडिटोरियम, एनडीए रोड, पाषाण, पुणे येथे ही परिषद होत आहे. 'विकसित भारतासाठी एरोस्पेस क्षेत्रातील आव्हाने' या संकल्पनेवर ही राष्ट्रीय परिषद होत आहे. परिषदेचे उद्घाटन शुक्रवार, दि. ३१ जानेवारी २०२५ रोजी सकाळी १० वाजता 'इसरो'चे माजी चेअरमन डॉ. एस. सोमनाथ, डीआरडीओ"चे माजी चेअरमन व सोसायटीचे अध्यक्ष डॉ. सतीश रेड्डी, महासंचालक प्रा. प्रतीक किशोर, 'डीआरडीओ' 'एचईएमआरएल'चे संचालक डॉ. ए. पी. दास, 'एआरडीई'चे संचालक अंकाती राजू, सहयोगी संचालक एम. व्ही. रमेश कुमार यांच्या उपस्थितीत होणार आहे. दुपारी ४ वाजता केंद्रीय हवाई वाहतूक मंत्री पिंजारापु राममोहन नायडू यांचे राष्ट्रीय परिषदेला संबोधन असणार आहे. यावेळी संयुक्त अरब अमिराती येथील अबुधाबी स्कुल ऑफ मॅनेजमेंटचे चेअरमन डॉ. तय्यब कमाली हे या कार्यक्रमासाठी विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. 'इसरो'चे चेअरमन डॉ. एस. सोमनाथ, डीआरडीओ"चे चेअरमन डॉ. सतीश रेड्डी यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित राहणार आहेत. हवाई क्षेत्राशी संबंधित नागरी हवाई उड्डाण, स्पेस व्हेइकल्स, सॅटेलाईट्स, एरो इंजिन्स, मिसाईल सिस्टिम्स, लढाऊ विमाने व एरोस्पेस, ड्रोन्स, हेलिकॉप्टर्स अशा विविध विषयांवर होणाऱ्या चर्चासत्रात तज्ज्ञ, शास्त्रज्ञ मार्गदर्शन करणार आहेत. स्टार्टअप आणि उद्योग यांच्यातील संवाद सत्राचे, विद्यार्थ्यांच्या प्रकल्पाचे प्रदर्शन, तसेच विविध स्मृती व्याख्याने या परिषदेत होणार आहेत.

# महिलांनी आत्मनिर्भर व्हावे - रेणू भाटीया





● राजगुरूनगर येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत बोलताना हरियाणा राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रेणू भाटीया. (छायाचित्र : किरण खुडे , राजगुरूनगर) ●

**राजगुरुनगर (किरण खुडे) (दै. आरंभ पर्व)**

राज्यघटनेने महिलांच्या समानतेचा मूलभूत हक्क मान्य केला आहे. त्यामुळे महिलांनी स्वतः:ला कमजोर न समजता आयुष्यात कितीही संकटे आली तरी संकटाशी धीराने सामना करून आत्मनिर्भर व्हावे, असे प्रतिपादन हरियाणा राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रेणू भाटीया यांनी केले. त्या खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत बोलत होत्या.

याप्रसंगी संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, ॲड. राजमाला बुट्टेपाटील, ॲड. सर्जेराव पानसरे, प्राचार्य डॉ. एस.एस.पिंगळे, डॉ.एच.एम.जरे, प्रबंधक के. आर. पाचारणे आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. रेणू भाटीया यांनी व्याख्यानमालेच्या आयोजनाबद्दल आनंद व्यक्त केला. साहेबराव बुट्टेपाटील यांच्या कार्याचा गौरव केला. पुढे त्या म्हणाल्या की, महिलांनी त्यांच्या सक्षमीकरणासाठी असलेल्या कायद्यांची माहिती करून घ्यायला हवी.

करियर अथवा कुटुंब जे समोर येईल त्यात सर्वोत्तम करण्याचा प्रयत्न करावा असे सांगून मुलींनी आकर्षक दिसण्याबरोबर संस्कारशील असण्याची गरज व्यक्त केली. लिव्ह इन रिलेशनशिपमुळे कुटुंब व्यवस्थेचे अध:पतन झाले आहे. तसेच नात्यातील आदर संपत चालल्यामुळे जवळच्या व्यक्तीकडून लैंगिक शोषणाच्या घटना घडताना दिसतात. अशा प्रकारच्या घटनांचा निषेध करून त्यांनी महिलांना गप्प न बसता अन्यायाला विरोध करण्याचे आवाहन केले. महिलांनी आपली कमजोरी इतरांना सांगण्यापेक्षा स्वतः धीराने सामना करावा. पुरुषांकडे मदतीसाठी गेल्यावर ते सहानुभूतीचा गैरफायदा घेतात असे त्या म्हणाल्या.

**मुलींनी आपले फोटो अथवा व्हिडिओ मित्रांना पाठवल्यामुळे निर्माण होणाऱ्या समस्यांची चर्चा केली. महिलांनी मधमाशी सारखे राहा. तोंडात गोडवा असला तरी कोणी गैरफायदा घेतल्यास रडत न बसता स्वतः्चे संरक्षण स्वतः करा. महिलांनी स्वतः्ला सिद्ध केले तरच समाज त्यांची दखल घेईल असे त्या म्हणाल्या. छत्रपती शिवाजी महाराजांनी महिलांचा जो सन्मान केला तो आदर्श समाजाने महिलांच्या बाबतीत जोपासण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. सूत्रसंचालन प्रा. धनंजय बोराडे यांनी केले. परिचय शिल्पा टाकळकर तर आभारप्रदर्शन संस्कृती टेंभुरकर या विद्यार्थीनींनी केले.**



## इंटरस्कूल क्विझिंग अवॉर्ड्स नाईटमध्ये सर्वोत्कृष्ट शाळांचा सन्मान

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

इंटरस्कूल ऑनलाइन क्विझिंग स्पर्धांसाठी प्रसिद्ध असलेल्या मैदान व्यासपीठाकडून दि. २३ जानेवारी २०२५ रोजी द फर्न रेसिडेन्सी, एमआयडीसी येथे भव्य पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात मैदान व्यासपीठाचा झपाट्याने विकास होण्यास योगदान दिलेल्या स्कूल लीडर्स आणि आघाडीच्या शाळांच्या कामगिरीचा गौरव करण्यात आला. पुणे शहरातील ६५ पेक्षा अधिक सहभागी शाळांबरोबर मैदान व्यासपीठाने १२,००० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांना मासिक ऑनलाइन क्विझिंग स्पर्धांमध्ये आपले कौशल्य सादर करण्याची संधी दिली आहे. सदर पुरस्कार तीन प्रमुख श्रेणींमध्ये प्रदान करण्यात आले. डोमेन एक्सलन्स या पुरस्काराने इंग्रजी, गणित, सामान्य ज्ञान व विज्ञान यांसारख्या विषयांमध्ये मैदान व्यासपीठाने आयोजित केलेल्या स्पर्धांमध्ये सर्वाधिक गुण प्राप्त करणाऱ्या शाळांचा गौरव करण्यात आला. यात जीके गुरुकुलने सर्वसाधा विजेतेपद पटकावले. मेरिट रँकर्स श्रेणीत पीसीएमसी क्षेत्रातील सर्वाधिक मेरिट पुरस्कार जिंकणाऱ्या शाळांचा सन्मान करण्यात आला, यात ब्लू रिज पब्लिक स्कूलने अव्वल क्रमांक मिळवला. तसेच, चॅम्पियन्स माइंडसेट पुरस्कार सर्व विषय व वर्गांमधील जास्तीत जास्त सहभागी विद्यार्थ्यांसाठी देण्यात आला, यात मोतीलाल तळेरा इंग्लिश मीडियम स्कूल विजयी ठरले."हजारो विद्यार्थ्यांच्या कष्ट आणि निष्ठेचा सन्मान पाहणे खरोखरच प्रेरणादायी होते.

स्कूल लीडर्स यांनी आपल्या संस्थांमध्ये मैदान व्यासपीठाने घडवलेल्या सांस्कृतिक परिवर्तनाचे कौतुक केले. या व्यासपीठामुळे विद्यार्थ्यांना आपल्या मर्यादांच्या पलीकडे जाऊन वेगवेगळ्या स्पर्धांमध्ये भाग घेण्यासाठी प्रोत्साहन मिळाले असून, अपयशाची भीती दूर सारण्याचा आत्मविश्वास निर्माण झाला आहे," असे मैदान व्यासपीठाचे सह-संस्थापक जुधाजित बाळ यांनी सांगितले.

## ओबेन इलेक्ट्रिकचा विस्तार

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

देशी इलेक्ट्रिक मोटरसायकल उत्पादक ओबेन इलेक्ट्रिक ने प्रजासत्ताक दिनानिमित्त देशभरातील महत्त्वाच्या ठिकाणी १० नवीन शोरूम्स आणि सेवा केंद्रे सुरू करून एक महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. या विस्तारामुळे, ओबेन इलेक्ट्रिक आता २२ शोरूम्स आणि सेवा केंद्रांच्या माध्यमातून १४ शहरांमधील ७ राज्यांतील ५३ दशलक्ष भारतीयांपर्यंत पोहोचले आहे. नवीन शोरूम्स पुण्यातील शिवाजीनगर आणि धनकवडी, कर्नाटकमधील हुबळी, केरळमधील मलप्पुरम आणि त्रिशूर, छत्तीसगडमधील बिलासपूर, उत्तर प्रदेशातील लखनौ, मैनपुरी आणि बदायुं, तसेच दिल्लीतील अधीचिनी येथे उघडण्यात आली आहेत.

या विस्तारामुळे ओबेनने उत्तर प्रदेश आणि छत्तीसगड या उभरत्या इलेक्ट्रिक वाहन बाजारपेठांमध्ये प्रवेश केला असून, कर्नाटक, केरळ आणि महाराष्ट्रातील उपस्थितीही मजबूत केली आहे.

सिरीज ए निधी संकलन यशस्वीपणे पार केल्यानंतर, ओबेन इलेक्ट्रिक आता भारताच्या प्रमुख आणि उभरत्या इलेक्ट्रिक वाहन बाजारपेठांमध्ये विस्तार करण्याचे उद्दिष्ट कंपनीने ठेवले आहे. आर्थिक वर्ष २६ पर्यंत ५० शहरांमध्ये १०० नवीन शोरूम्स आणि सेवा केंद्रे उघडून शहरी आणि टियर-२ शहरांमध्ये आपला प्रभाव प्रस्थापित करणार आहे. नवीन विस्ताराबाबत ओबेन इलेक्ट्रिकच्या संस्थापक आणि सीईओ मधुमिता अग्रवाल म्हणाल्या, “प्रजासत्ताक दिन साजरा करताना देशभर आमचा विस्तार करण्याचा आनंद आणि अभिमान आहे. १० नवीन शोरूम्स उघडून आम्ही उत्तर प्रदेश आणि छत्तीसगडमध्ये प्रवेश करत आहोत, तसेच प्रमुख ईव्ही बाजारपेठांमध्ये आमची उपस्थिती अधिक मजबूत करत आहोत. पर्यावरण-जागरूक ग्राहकांसाठी सुलभ आणि अखंड इलेक्ट्रिक वाहन अनुभव देण्याच्या आमच्या वचनबद्धतेवर ओबेन ठाम आहे.”

## इसुझु मोटर्स इंडियाच्यावतीने ४ नवीन टच पॉइंट दाखल




**चेन्नई (दै. आरंभ पर्व)**

जपानच्या इसुझु मोटर्स लिमिटेडची उपकंपनी इसुझु मोटर्स इंडियाच्या वतीने भारतभर चार नवीन टच पॉईंटची उदघाटनाने करण्यात आली असून देशात आपला विस्तार करत आहे. यामध्ये इंदूर, मध्य प्रदेश आणि पाटणा, बिहार येथील दोन नवीन 3 एस (विक्री, सेवा आणि सुटे भाग) विक्रेत्यांसह खम्मम, तेलंगणा आणि रत्नागिरी, महाराष्ट्र येथील दोन नवीन अधिकृत सेवा केंद्रांचा (एएससी) समावेश आहे.


या नवीन जोडण्यांसह, इसुझुचे जाळे भारतभर 72 ठिकाणी वाढले आहे. ग्राहकांच्या अगदी जवळ उपस्थिती असणे, ग्राहक समाधान आणि सहज मालकीचा अनुभव देण्याच्या त्याच्या वचनबद्धतेची पुष्टी करते.

इसुझु मोटर्स इंडियाने इंदूरसाठी सागर इसुझु आणि बिहारमधील इम्पीरियल इसुझु यांच्याशी भागीदारी केली आहे. यामुळे बिहारमध्ये इसुझु ब्रँडचा विस्तार झाला. सेवा आणि ग्राहक संबंध वाढवण्यासाठी कंपनीने खम्मम, तेलंगणा आणि रत्नागिरी, महाराष्ट्र येथे नवीन एएससीचे उद्घाटन केले. खम्मम एएससी, बियॉन्ड ऑटो केअरद्वारे, तर रत्नागिरी एएससी, श्राइन इसुझूद्वारे चालवली जाते. श्राइन इसुझु कोल्हापूरमध्ये 3एस सुविधा देखील चालवते. या सुविधा इसुझु विक्रेत्याच्या मानकांनुसार बांधल्या जातात आणि सर्व कर्मचारी सदस्यांना इसुझु तज्ज्ञांकडून अपवादात्मक ग्राहक अनुभव उपलब्ध करून देण्यासाठी प्रशिक्षण दिले जाते.

संपर्कजाळे विस्ताराविषयी बोलताना इसुझु मोटर्स इंडियाचे प्रेसिडेंट आणि मॅनेजिंग डायरेक्टर राजेश मित्तल म्हणाले, “आमच्या निरंतर नेटवर्क/संपर्कजाळे विस्तारामुळे इसुझुची ब्रँड प्रगती दिसून येते. तसेच भिन्न अनुभव देताना आमच्या ग्राहकांच्या अगदी जवळ उपलब्ध राहण्याची आमची वचनबद्धता अधोरेखित होते. आम्ही विक्रेते आणि सेवा केंद्रांच्या समावेशामुळे, देशभरातील इसुझु वाहनांची वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी चांगल्या स्थितीत आहोत.”

इसुझु मोटर्स इंडियाचे डेप्युटी मॅनेजिंग डायरेक्टर तोरू किशिमोटो म्हणाले, "इसुझुमध्ये आम्ही ग्राहकांच्या आनंदाला त्यांच्या मालकीच्या संपूर्ण प्रवासात प्राधान्य देतो. या नवीन सुविधा अखंड, वैयक्तिकृत विक्री आणि सेवा अनुभव प्रदान करण्याच्या आमच्या वचनबद्धतेला बळकटी देतात. आम्ही मालकीचा प्रवास उंचावण्याचा प्रयत्न करतो. इसुझुचा प्रवास पुढे नेण्याच्या आमच्या नवीन विक्रेत्यांच्या प्रयत्नांसाठी आम्ही त्यांना शुभेच्छा देतो.”

## ब्लेंडर्स प्राइड फॅशन टूर




**नवी दिल्ली (दै. आरंभ पर्व)**

ब्लेंडर्स प्राइड फॅशन टूर त्याच्या सर्वात प्रसिद्ध आवृत्तीचे उद्घाटन करतो, जिथे फॅशन फक्त प्रारंभ आहे आणि 'द वन अँड ओन्ली' अशी एक अनोखी दुनिया तयार केली जाते. 2025 च्या टूरमध्ये अत्याधुनिक रूप उलगडले जाईल जे अत्याधुनिकतेत प्रवेश करेल, आणि जागतिक फॅशन, संगीत आणि मनोरंजन यांचे शानदार प्रदर्शन करून शुद्ध आश्चर्य उत्पन्न करेल.

फॅशन डिझाईन कौन्सिल ऑफ इंडिया (एफडीसीआय) सोबत एकदा पुन्हा यशस्वीपणे भागीदारी करत, फॅशन टूर त्याच्या ग्लॅमरस आणि विलासीतेचा उत्सव साजरा करेल. यामध्ये भारतातील काही अत्यंत मागणी असलेले फॅशन क्षेत्रातील आवाज आणि भारतातील सर्वात आकर्षक स्टाइल आयकॉन्स सहभागी होणार आहेत, जे निःसंशयपणे देशभर चर्चेचा विषय ठरतील. प्रत्येक शहरात, हा टूर वेगवेगळ्या कथांचा निर्माण करेल, ज्यामध्ये त्याच्या प्रतीकात्मक जगाचे अद्वितीय रूप दाखवले जातील. हा टूर गुरुग्राममध्ये सुरू होईल, भारताच्या एकमेव खऱ्या फॅशन आयकॉन रोहित बाळ यांचा शानदार उत्सव साजरा करत, ज्यामध्ये फॅशन, बॉलिवूड, मीडीया आणि बिझनेस या क्षेत्रातील 70 पेक्षा जास्त प्रसिद्ध व्यक्तिमत्त्वे सहभागी होणार आहेत, जे अनेक वर्षांपासून त्यांचे जवळचे मित्र आणि साथीदार राहिले आहेत. मुंबईत, हा टूर एक विधान करणारा फॅशन शो दाखवेल, ज्यामध्ये तरुण ताहिलियानी यांचा समावेश असेल, आणि भारताच्या ग्लॅमर राजधानीच्या प्रसिद्ध पार्श्वभूमीवर हे सादर होईल. हा शो भारतीय फॅशनच्या समकालीन मर्यादा ओलांडून, जगासाठी त्याचे पुर्नपरिभाषण करेल. चंदीगड, गुवाहाटी आणि विशाखापट्टणमच्या बूम टाउन शहरांमध्ये त्याच्या आकर्षक जगाचे दर्शन देणारा हा टूर प्रत्येक गंतव्यस्थानाला एक ऐतिहासिक टप्पा बनवेल, जो फॅशनच्या भविष्याचा सर्वोच्च मानक स्थापित करेल. चंदीगडमध्ये, कणिका गोयल आणि जॅकलीन फर्नांडिस एक विजेची झलक असलेली संकल्पना सादर करतील, ज्यामध्ये स्ट्रीट-स्टाइल कला आणि हॉट फॅशनचा मिलाफ दिसेल.

गुवाहाटीमध्ये, टायगर श्रॉफसोबत जॉयवॉकिंग त्यांच्या अद्वितीय दृष्टिकोनातून त्यांची अमूर्त रचनात्मकता आणि एट - लेझर च्या आरामदायक अदा एकत्र आणतील.

# स्विगीकडून डिलिव्हरी कर्मचाऱ्यांसाठी रस्ता सुरक्षा जागरूकता सत्राचे आयोजन

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

स्विगी या भारताच्या आघाडीच्या ऑन डिमांड सुलभता प्लॅटफॉर्मने पुणे वाहतूक पोलिसांच्या सहयोगाने आपल्या रस्ता सुरक्षा सनद असलेल्या डिलिव्हरिंग सेफली अंतर्गत पुण्यातील डिलिव्हरी कर्मचाऱ्यांसाठी रस्ता सुरक्षा जागरूकता सत्राचे आयोजन केले.

हा कार्यक्रम शहरातील १३० पेक्षा अधिक डिलिव्हरी भागीदारांना शिक्षित आणि सबल करण्याच्या हेतूने आयोजित करण्यात आला होता. या सत्राची रचना सुरक्षित, सकारात्मक वाहनचालनाच्या सवयी लावणे, वाहतुकीच्या नियमांचे पालन करण्याचे महत्त्व अधोरेखित करणे



आणि वेळेचे व मार्गाचे योग्य नियोजन करून धोकादायक वर्तन टाळणे यांच्यासाठी करण्यात आले होते. पुण्याचे पोलिस उपायुक्त श्री. अमोल झेंडे, वरिष्ठ पोलिस निरीक्षक श्री. सुनील गवळी, आरएसपी वाहतूक श्री. हनीफ शेख आणि आरएसपी वाहतूक श्री. देवीदास पाटील या पुणे वाहतूक पोलिस अधिकाऱ्यांनी हे सत्र चालवले आणि डिलिव्हरी भागीदारांना मोलाचे प्रशिक्षण आणि मार्गदर्शन केले. “भारतात मागील दोन वर्षांत रस्त्यांवरील अपघात आणि मृतांची संख्या वाढली आहे. जगभरातील सर्वाधिक रस्त्यांवरील अपघात भारतात होता. डिलिव्हरिंग सेफली या सनदेअंतर्गत स्विगी आपल्या डिलिव्हरी भागीदारांचे कल्याण व सुरक्षेसाठी वचनबद्ध आहे. ती पोलिस अधिकाऱ्यांच्या सहयोगाने देशभरात विविध रस्ता सुरक्षा जागरूकता उपक्रमांचे आयोजन करते. त्याचे उद्दिष्ट रस्ता सुरक्षा वाढीस लावणे आणि डिलिव्हरी पार्टनर्स कायम वाहतुकीच्या नियमांचे पालन करतील याची काळजी घेण्याचे आहे. आम्हाला मुंबई वाहतूक पोलिसांनी दिलेल्या पाठिंब्याबद्दल त्यांचे आभारी आहोत आणि आमच्या व्यवसायाचे प्रमुख स्तंभ असलेल्या डिलिव्हरी भागीदारांमध्ये वाहतुकीबाबत जागरूकता निर्माण करून त्यांची सुरक्षितता वाढेल अशी आम्हाला आशा वाटते” असे मत स्विगी ड्रायव्हर्स ऑर्गनायझेशनचे वरिष्ठ उपाध्यक्ष शलभ श्रीवास्तव यांनी व्यक्त केले.

मागील काही वर्षांत स्विगीने आपल्या डिलिव्हरी भागीदारांसाठी सुरक्षित कार्यस्थळ निर्माण करण्याच्या कटिबद्धतेचा भाग म्हणून भारतभरातील विविध शहरांमध्ये मोहिमा आयोजित केल्या आहेत. स्विगीमधील डिलिव्हरी भागीदारांना रस्त्यांवर त्यांचे रक्षण करणारा विमा दिला जातो. मागील वर्षी एप्रिल महिन्यात स्विगीने रस्ता सुरक्षा आणि वाहतूक जागरूकता कार्यशाळेसाठी गुरूग्राम वाहतूक पोलिसांसोबत भागीदारी केली होती. या प्रशिक्षण कार्यशाळेत १०० पेक्षा जास्त डिलिव्हरी भागीदार उपस्थित होते. २०२३ मध्ये उद्योगातील पहिलाच उपक्रम म्हणून स्विगीने आपल्या डिलिव्हरी भागीदारांना मागणीवर, मोफत आणि वेगवान रूग्णवाहिका सेवा देण्यासाठी डायल ४२४२ सोबत भागीदारी केली होती. स्विगीकडे इमर्जिन्सी सपोर्ट सर्व्हिसेस (ईएसएस) आहेत. त्यात आपत्कालीन परिस्थितीत किंवा रस्त्यावरील अपघातात डिलिव्हरी भागीदारांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी विविध पर्यायांचा समावेश आहे. ईएसएसमध्ये २४*७ हॉटलाइन नंबर, डिलिव्हरी भागीदारांसाठी इमर्जन्सी कार्ड्स आणि डिलिव्हरी पार्टनर ॲपमध्ये एसओएस बटणाद्वारे स्थानिक पोलिस व रूग्णवाहिका सेवेशी थेट संपर्क साधण्याची सोय आहे.

स्विगीसाठी आपल्या डिलिव्हरी भागीदार व संपूर्ण समाजाची सुरक्षा आणि कल्याण यांना सर्वाधिक महत्त्व आहे. स्विगीच्या सर्व डिलिव्हरी भागीदारांना नेमणुकीच्या वेळी सुरक्षा मार्गदर्शन मोड्यूल शिकवले जाते. या प्लॅटफॉर्मवर संपूर्ण वर्षभर मदत आणि मार्गदर्शनासाठी सुरक्षा मोहिमांचेही आयोजन केले जाते.

## थोडक्यात



### रामतीर्थ व वीरेश्वर तलावाच्या संवर्धनासाठी निधी मिळावा : आ. शेखर निकम

चिपळूण (आरंभ पर्व) : शहरातील तलावांच्या संवर्धनासाठी आमदार शेखर निकम यांनी पुढाकार घेतला असून राज्य सरोवर संवर्धन योजनेअंतर्गत रामतीर्थ व वीरेश्वर तलावाच्या संवर्धनासाठी निधी मिळावा, अशी मागणी पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री ना. पंकजा मुंडे यांच्याकडे नुकतीच निवेदनाद्वारे केली आहे. तर चिपळूण नगर परिषदेचे मुख्याधिकारी विशाल भोसले यांचीदेखील महत्वपूर्ण भूमिका राहिली आहे. गेल्या पाच वर्षाच्या कालखंडात चिपळूण शहराच्या विकासासाठी आमदार शेखर निकम यांनी पुढाकार घेतल्याचे पहावयास मिळाले आहे. यामध्ये शहरात वाशिष्ठी नदीवरील पेठमाप व शंकरवाडीला जोडणारा पूल असो, पवन तलाव व गोवळकोट मैदानाच्या सुशोभिकरणासाठी घेतलेला पुढाकार तसेच नारायण तलाव असो आदी शहरातील कामांसाठी आ. निकम यांनी नेहमीच पुढाकार घेतला. यामुळे खेळाडू व पर्यटकांना चांगला वाव मिळाला आहे. चिपळूण शहराच्या वैभवात आणखी भर पडावी, यासाठी आमदार शेखर निकम यांनी आता पुढाकार घेतला असून राज्य सरोवर संवर्धन योजनेअंतर्गत शहरातील वीरेश्वर तलावाच्या संवर्धनासाठी १ कोटी ५१ लाख ६५ हजार ६६४ रुपये व रामतीर्थ तलावाच्या संवर्धनासाठी ३ कोटी ७९ लाख ८३ हजार ७९९ रुपयांच्या निधीस मंजुरी मिळून प्रशासकीय मान्यता मिळावी अशी मागणी केली आहे. या निवेदनावर ना. पंकजा मुंडे यांनी सकारात्मकता दर्शवली असून लवकरच या दोन्हीच्या कामांसाठी निधी मिळून चिपळूण शहराच्या वैभवात भर पडण्यास मदत होणार आहे.



### १ व २ फेब्रुवारीला 'अभया' राज्यस्तरीय परिषद; रहाटकर यांच्या हस्ते उद्घाटन

पुणे (आरंभ पर्व) : वंचित विकास व उदयकाळ फौंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने अभया अभियाना अंतर्गत दोन दिवसीय 'अभया' राज्यस्तरीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती वंचित विकास संस्थेच्या कार्यवाह व संचालक मीनाताई कुर्लेकर यांनी पत्रकार परिषदेत दिली. प्रसंगी वंचित विकास संस्थेच्या संचालक सुनीताताई जोगळेकर, मीनाक्षीताई नवले आणि उदयकाळ फाउंडेशनच्या प्रमुख आरतीताई बागुल आदी उपस्थित होते. मीनाताई कुर्लेकर म्हणाल्या, "महाराष्ट्रातील एकल महिलांवर काम करणाऱ्या विविध जिल्ह्यातील ५० सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी या परिषदेत सहभागी होत आहेत. ही परिषद शनिवार, दि. १ व रविवार, दि. २ फेब्रुवारी २०२५ या दोन दिवशी सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत नीहार आनंद निवास, वडगाव शिंदे रोड,लोहगाव, पुणे येथे होणार आहे. या परिषदेचे उद्घाटन शनिवार, दि. १ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता केंद्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांच्या हस्ते होणार आहे."एकल महिलांचे प्रश्न व सामाजिकसंस्थेची जबाबदारी या अनुषंगाने काम करत असताना संस्थेला येणाऱ्या अडचणी समजुनघेण्यासाठी परिषदेमध्ये विविध चर्चासत्र आयोजित केले आहे. यामध्ये विविध संस्थांचा कार्यपरिचय, महिलांचे प्रश्न व केस स्टडी यावर विचारमंथन होणार आहे. आर्थिक साक्षरतेवर स्वाती दुधाले, एकल महिलांचे भावनिक व मानसिक व्यवस्थापन यावर डॉ. सागर पाठक मार्गदर्शन करणार आहेत. शासकीय योजना व सामाजिक संस्थांना संधी यावर शासकीय प्रतिनिधी मार्गदर्शन करतील, तर सर्व संस्थांच्या प्रतिनिधींकडून काही सूचना आणि ठराव मांडण्यात येणार आहेत," असेही त्यांनी नमूद केले.

# अतिक्रमणांवर सर्जिकल स्ट्राईक

## पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांचा कडक इशारा : आयुक्तांनी आमदार, अधिकारी, ग्रामस्थांसह वाघोलीत केली पाहणी



**वाघोली (दै. आरंभ पर्व)**

वाघोलीत होणारी वाहतूक कोंडी गंभीर असून या वाहतूक कोंडीला कारणीभूत ठरणारी वाहने, नो एन्ट्री, ट्रिपल सीट, अवैध वाहतुकीवर तसेच रस्त्याच्या कडेला वाहतुकीला अडथळा करणारी अतिक्रमणे संबंधित यंत्रणेच्या मदतीने सर्जिकल स्ट्राईक करून काढून टाकणार असल्याचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी सांगितले असून वाहतुकीला शिस्त लावण्यासाठी कोणतीही हयगय केली जाणार नसल्याचा कडक इशारा त्यांनी दिला. वाहतूक कोंडीवर काय उपाययोजना केल्या गेल्या याचा १० फेब्रुवारी रोजी पुन्हा आढावा आयुक्त कुमार घेणार आहेत. शिरूर-हवेली मतदारसंघातील शहरालगत येणाऱ्या गावांच्या ट्रॅफिक समस्या सोडविण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक मंगळवारी (दि. २८) वाघोली येथे संपन्न झाली. बैठकीपूर्वी आयुक्त कुमार यांनी आमदार ज्ञानेश्वर कटके, विविध विभागाचे अधिकारी, ग्रामस्थांसह वाघोलीत प्रत्यक्ष उतरून वाहतूक कोंडीबाबत माहिती घेऊन उपाययोजना करण्याच्या सूचना संबंधित विभागांना दिल्या. बैठकीला अप्पर पोलीस आयुक्त मनोज पाटील, वाहतूक शाखेचे उपायुक्त अमोल झेंडे, परिमंडळ ४ चे उपायुक्त हिम्मत जाधव, पीएमपीएमएलच्या दीपा मुधोळ-मुंडे, महापालिका, सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, आरटीओ, महावितरण व विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते. उपस्थित नागरिकांनी यावेळी वाहतुकीला भेडसावणाऱ्या विविध समस्या मांडल्या. संयुक्त बैठक आणि पाहणी दरम्यान विविध समस्या आणि त्या समस्यांचे निवारण कशाप्रकारे करता येईल यावर चर्चा झाली. दरम्यान चुकीच्या पद्धतीने थांबणाऱ्या ट्रॅव्हल्स, रिक्षा तसेच जड वाहने, रोडला असणारी अनधिकृत बांधकामे, रोडवर अडथळा निर्माण करणारे लाईटचे पोल, उडणारी धूळ, रस्त्याच्या उलट्या दिशेने होणारी वाहतूक, ट्रिपल सीट्स, मद्यपान करून ड्रायव्हिंग तसेच इतरही अनेक समस्यांवर तोडगा काढण्यासाठी उपाययोजना करण्याच्या सूचना आयुक्त कुमार यांनी संबंधितांना दिल्या.

### ट्रॅव्हल्स बसेस थांबा रस्त्यावर नको

नगर, मराठवाडा विदर्भात जाणाऱ्या बसेस प्रवाशांना घेण्यासाठी वाघोलीतील मुख्य चौकांमध्ये थांबत असल्याने वाहतुकीला अडथळा होऊन कोंडीमध्ये भर पडत असल्याची बाब प्रकर्षाने समोर येत असल्याने आयुक्त अमितेश कुमार यांनी आरटीओ व वाहतुक विभागाला सक्त सूचना देऊन एकही ट्रॅव्हल्सची बस पुणे-नगर रोडवर थांबणार नाही याची दक्षता घेण्याबाबत सांगितले. बकोरी फाट्यालगत तयार करण्यात आलेल्या जागेमध्ये बसेस लागतील याबाबत कार्यवाही करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

### जबाबदारी ढकला ढकलीने आजपर्यंत कामे रखडली

पुणे-नगर महामार्गावर वाघोलीत वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी महामार्गावरील रस्त्याची व इतर कामे करून घेण्याकरिता पोलीस विभाग आग्रही भुमिका घेऊन पाठपुरावा करीत असताना पुणे महापालिका, पीएमआरडीए, सार्वजनिक बांधकाम विभाग सोयीस्करपणे एकमेकांवर ढकला ढकली करीत असल्याची बाब बैठकीमध्ये पुन्हा एकदा समोर आली. सर्व विभागांनी या कामासाठी एकत्रित काम करावे असे उपस्थितांनी सांगितले.

**वाघोली मध्ये पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली बैठक पार पडली. यावेळी अमितेश कुमार यांनी संबंधित सर्वच विभागाच्या अधिकाऱ्यांना योग्य त्या सूचना दिले आहेत त्यामुळे येत्या काळात याच्यावरती अंमलबजावणी होऊन वाघोलीतील वाहतूक कोंडी दूर करण्यास नक्कीच मदत होईल अशी आशा या निमित्ताने निर्माण झाली आहे.**
**- कल्पेश जाचक, अध्यक्ष श्री शिवछत्रपती प्रतिष्ठाण**

## सैनिकांबद्दल आदर कायम ठेवावा
### अनुराधा प्रभुदेसाई

**राजगुरुनगर-किरण खुडे (दै. आरंभ पर्व)**

देशाच्या संरक्षणासाठी लढणाऱ्या सैनिकांच्या कार्याचा प्रत्येक नागरिकाने आदर ठेवावा. त्यांच्या बलिदानामुळेच आपण स्वातंत्र्य उपभोगतो आहोत. त्यांनी केलेल्या त्यागासाठी आपण पात्र व्हायला हवं, असे प्रतिपादन प्रसिद्ध लेखिका अनुराधा प्रभुदेसाई यांनी केले. त्या खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत 'ऋणानुबंध सैनिकांशी' या विषयावर बोलत होत्या.

या प्रसंगी संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, ॲड. राजमाला बुट्टेपाटील, ॲड. सर्जेराव पानसरे, प्राचार्य डॉ. एस.एस. पिंगळे, डॉ.एच.एम.जरे, प्रबंधक के. आर. पाचारणे आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.



अनुराधा प्रभूदेसाई पुढे म्हणाल्या की, स्वातंत्र्याची किंमत सीमेवर फक्त सैनिक मोजत असतात. नागरिकांनी त्याची जाणीव ठेवून स्वातंत्र्याला स्वैराचाराचे रूप येणार नाही याची काळजी घ्यायला हवी. तरुणाईवर देशाची मदार असून समर्पण, नैतिकता, माणुसकी, कर्तव्यनिष्ठता, संस्कार हे गुण सैनिकांकडून शिकण्यासारखे आहेत. समाजात जातीपातीची, द्वेषाची भावना दृढ झाली असून समाजमनाची घडी विस्कटत चालली आहे. या पार्श्वभूमीवर प्रत्येकात भारतीयत्वाची भावना वाढीस लागायला हवी. तरुणांमध्ये देशप्रेम व सैन्य दलाबद्दल आकर्षण निर्माण व्हावे व देशप्रेमाची ज्योत प्रत्येकाच्या मनात पेटत राहावी याबद्दल त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन डॉ.दिलीप मुळूक, परिचय प्रा. वर्षा कांबळे व आभार अक्षदा कोळेकर या विद्यार्थीनीने मानले.

## कोरेगाव भीमात महिला खेळाडूच्या हस्ते ध्वजावंदन
### सरपंच सरपंच संदीप ढेरंगेंकडून ध्वजारोहणाचा मान खेळाडूला



**शिक्रापूर (दै. आरंभ पर्व)**

एकीकडे ध्वजारोहणाच्या मानावरुन अनेक ठिकाणी राजकारण सुरु असताना शिरुर तालुक्यातील कोरेगाव भिमा ग्रामपंचायतचे सरपंच संदीप ढेरंगे यांनी मात्र प्रजासत्ताक दिनी स्वतःचा ध्वजवंदनाचा मान महाराष्ट्र राज्य महिला क्रिकेट संघाच्या कर्णधारपदी निवड झालेल्या आँचल मनोज आगरवाल या महिला खेळाडूला देऊन जनतेपुढे आगळावेगळा आदर्श घालून दिला आहे. कोरेगाव भीमा ता. शिरुर येथे प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने गुणवंत विद्यार्थी गुणगौरव सोहळा व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ग्रामपंचायतचे ध्वजारोहण सरपंच संदीप ढेरंगे यांच्या हसरे होत असताना त्यांनी ध्वजारोहणचा मान गावातील महाराष्ट्र राज्य महिला क्रिकेट संघाच्या कर्णधारपदी निवड झालेल्या आँचल मनोज आगरवाल या आदर्श महिला खेळाडूला दिला, यावेळी सरपंच संदीप ढेरंगे, उपसरपंच सविता घावटे, ग्रामपंचायत सदस्य अमोल गव्हाणे, केशव फडतरे, महेश ढेरंगे, गणेश कांबळे, शरद ढेरंगे, अनिकेत गव्हाणे, वंदना गव्हाणे, मनीषा गव्हाणे, जयश्री गव्हाणे, कोमल खलसे, शिल्पा फडतरे, ग्रामविकास अधिकारी श्रीकांत वाव्हळ यांसह आदी पदाधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते, दरम्यान अण्णासाहेब मगर बँकेचे संचालक राजाराम ढेरंगे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या कार्यक्रम प्रसंगी तब्बल १८४ गुणवंत विद्यार्थी, मार्गदर्शक शिक्षक व विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या गुणवंताचा ग्रामपंचायतच्या वतीने सन्मान करण्यात आला. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ग्रामपंचायत सदस्य महेश ढेरंगे यांनी केले तर प्रास्ताविक माजी सरपंच विजय गव्हाणे यांनी केले आणि सरपंच संदीप ढेरंगे यांनी आभार मानले.

### स्वतःचा मान दुसऱ्यांना देणे अभिमानास्पद

**जीवनात तुमचे क्षेत्र कोणतेही असो मेहनत व जिद्दीच्या जोरावर यश नक्कीच मिळते, एकीकडे ध्वजारोहणाच्या मानावरून राजकारण होत असताना कोरेगाव भीमाचे सरपंच संदीप ढेरंगे यांनी स्वतःचा ध्वजारोहणाचा मान मला देत समाजासमोर आदर्श निर्माण केला हा क्षण आम्हा खेळाडूंच्या दृष्टीने अभिमानाचा असल्याचे महाराष्ट्र राज्य महिला क्रिकेट संघाच्या कर्णधारपदी निवड झालेल्या आँचल मनोज आगरवाल यांनी सांगितले.**

# 'अंतर योग फाऊंडेशन' तर्फे २६ आणि २७ फेब्रुवारी रोजी भव्यदिव्य महाशिवरात्री उत्सवाचे आयोजन

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

आचार्य उपेंद्रजी यांच्या अतुल्य अशा मार्गदर्शनाखाली 'अंतर योग फाऊंडेशन' २६ आणि २७ फेब्रुवारी २०२५ रोजी मुंबईत ऐतिहासिक अशा महाशिवरात्रीचे आयोजन करत आहे. २४ तास चालणाऱ्या या अध्यात्मिक महोत्सवात तब्बल १ लाख भाविक सहभागी होणार आहेत. आरोग्य, प्रगती, भरभराट, ज्ञान, महिला सक्षमीकरण या विविध पैलूंभोवती या अनोख्या अशा सोहळ्याची भिस्त असेल. त्या मध्यमातून अर्थ, क्रीडा आदी विविध क्षेत्रातील नेतृत्त्व उभे करण्यावर भर असेल आणि त्याचवेळी सक्षम नागरिक निर्माण व्हावेत, असेही या आयोजनाचे उद्दिष्ट असेल.



हे आयोजन मुंबईत गोरेगाव येथील बॉम्बे एक्झिबिशन सेंटर येथे होत असून भारतभरातील अध्यात्मिक गुरु यात सहभागी होणार आहेत. त्याशिवाय आघाडीचे उद्योजक, विविध क्षेत्रातील महनीय व्यक्तिमत्त्वे यात सहभागी होणार आहेत. त्याचबरोबर तब्बल १ लाख भाविक या सोहळ्याला आपली उपस्थिती लावणार आहेत. या सोहळ्या विनामूल्य प्रक्षेपण लाईव्ह स्ट्रीमिंगद्वारे होणार आहे. तसेच या भव्यदिव्य महाशिवरात्री उत्सवासाठी प्रवेश विनामूल्य आहे.

दुर्मिळ व आधुनिक अशी शिवसाधना, शक्तिपात दीक्षा आणि अनोखी अशी ज्ञानधारणा सत्रे यांच्या माध्यमातून आचार्य उपेंद्रजी यांनी अगणित लोकांच्या आयुष्यात अमुलाग्र बदल घडवून आणले आहेत. त्यांचे आरोग्य, संपत्ती आणि नातेसंबंध यांमधील ज्या विविध समस्या होत्या, त्या त्यांनी लीलया सोडवल्या आहेत. हेच फायदे मोठ्या प्रमाणावर सर्वसामान्य जनतेला उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने आता हे भव्य असे आयोजन केले जात आहे.

पथदर्शी अशा या प्रयत्नाचा भाग म्हणून 'अंतर योग फाऊंडेशन' तब्बल ५००० भाविकांसाठी रक्ततपासणी शिबीरसुद्धा आयोजित करत आहे. आधी नोंदणी केलेल्या भाविकांची तपासणी याद्वारे होणार असून त्याद्वारे त्यांना शक्तिशाली अशा उपचारपद्धती उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. अभूतपूर्व असे हे आयोजन असून त्याद्वारे प्राचीन अध्यात्मिकता आणि आधुनिक विज्ञान यांचा अनोखा असा संगम अभूतपूर्व अशा प्रमाणावर साधला जाणार आहे. पितृ ऋण मुक्ती साधना' या आगळ्या अशा साधनेतून कोटी कोटी पितरांच्या मुक्तीचा एक सोहळा यावेळी सादर होणार आहे. प्रत्येक व्यक्तीच्या प्रगतीमध्ये जो अडथला ठरतो, तो तत्काळ दूर करणारी ही साधना आहे. त्याचबरोबर या आयोजनाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे शिवमंत्र आणि स्तोत्र यांचे पठण केले जाणार असून त्यात २५,००० भाविक सहभागी होणार आहेत. त्याद्वारे पवित्र ऊर्जा आणि आशीर्वाद या माध्यमातून प्राप्त होणार आहे. या पवित्र अशा सामुहिक पठणाच्या माध्यमातून नकारात्मकता नष्ट होते आणि संपूर्ण वातावरण दैवी सकारात्मकतेने भरले जाते. त्यातून एकूण शारीरिक कल्याण साधले जाते आणि शक्तिशाली असे कंप निर्माण होतात. मनःशांती प्राप्त होते आणि लक्ष अविचल राहते. यासोबत ५ कोटी लोक गणेशमंत्र एकत्रितपणे पठण करणार आहेत. भारताच्या भविष्यासाठी दूरदृष्टी असलेले नेतृत्व निर्माण करण्यासाठी हा खास महत्त्वपूर्ण अध्यात्मिक उपक्रम हाती घेतला गेला आहे. या उपक्रमामध्ये २४-तासांच्या यज्ञाचाही समावेश आहे. हे सत्र तपस्वी ब्राह्मण आयोजित करणार आहेत आणि त्यातून मानवी जातीच्या एकत्रित कल्याण व भरभराटीसाठी दैवी आशीर्वाद मिळविण्याचे लक्ष्य आहे. या भव्य आणि दिव्य अशा आयोजनाचा एक भाग आचार्य उपेंद्रजी दाखल करणार असून ते अथर्वशीर्ष शास्त्रावरील प्रभावी व अंतरदृष्टीसंबंधी समालोचन करणार आहेत. या अनोख्या अशा पुस्तकातून याआधी कधीही समोर आले नाही असे अध्यात्मिक सत्य समोर येते आणि त्यातून कालातीत ज्ञान आणि मानवतेवरील अतुल्य असे मार्गदर्शन प्राप्त होते. भावी भक्कम नेते आणि कणखर नागरिक निर्माण करण्याच्या उद्दिष्टाने हे तयार केले गेले असून या उत्तम अशा कालाकृतीमधून ज्ञान समोर येते आणि त्यातून आयुष्यातील आव्हानांचा सामना करण्याची आणि चांगले माणूस होण्याची एक प्रक्रीया निर्माण होते.

आचार्य उपेंद्रजी हे एक अध्यात्मिक गुरु असून त्यांचे शिष्य जगभर पसरलेले आहेत. ते म्हणतात, "महाशिवरात्री हे काही केवळ एक अध्यात्मिक आयोजन नाही तर आपल्या देशातील नितीमत्ता असलेल्या नागरिकांचे संरक्षण करणे, त्यांना सबळ करणे व त्यांची उन्नत्ती साधने यासाठी हा एक प्रयत्न आहे. हा उत्सव म्हणजे भारताचे भवितव्य पुन्हा एकदा लिहिण्याची ती एक संधी असून त्यातून सर्वांसाठी आरोग्य, भरभराट आणि अध्यात्मिक वृद्धी साध्य करायची आहे."

या भव्य अशा उत्सवाच्या अयोजानाचा भाग म्हणून 'अंतर योग फाऊंडेशन' विशेष उर्जाभरी औषधे दाखल करणार असून त्यातून झटकन उपचार व कल्याण साधणे अपेक्षित आहे. या आयोजनामध्ये आयुर्वेदिक तज्ज्ञांबरोबर समूह चर्चा आयोजित केली जाणार आहे. त्यातून नाविन्यपूर्ण आरोग्य उपचार साध्य केले जावू शकतात. त्यातून देशपातळीवरील आरोग्यक्रांती साध्य केली जावू शकते.

त्याचबरोबर शिव तांडव कार्यक्रम आणि हृदयस्पर्शी असा अध्यात्मिक संगीत सोहळा सादर होणार असून त्यात अनेक नावाजलेले कलाकार सहभागी होणार आहेत. या संपूर्ण आयोजनात १ लाखांहूनही अधिक लोक सहभागी होणार आहेत. त्यांना अन्नदान आणि प्रसाद यांच्या माध्यमातून अध्यात्मिक उर्जाभरे अन्न दिले जाणार आहे. त्यातून हे आयोजन म्हणजे सर्वांसाठी समावेशक आणि समृद्ध करणारा अनुभव सिद्ध होणार आहे.

'अंतर योग फाऊंडेशन' समाजाच्या सर्वच स्तरातील लोकांना या अतुलनीय अशा अध्यात्मिक कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी निमंत्रित करत आहे. त्यातून आरोग्यपूर्ण, भरभराट झालेला आणि अध्यात्मिकदृष्ट्या संपन्न असा भारत निर्माण करण्याचे समर्पित उद्दिष्ट आहे.

**या आयोजनाची माहिती**
**तारीख : २६ आणि २७ फेब्रुवारी २०२५ /सकाळी ७ ते दुसऱ्या दिवशी सकाळी ७ वा.**
**कालावधी : २४ तास**
**स्थळ : बॉम्बे एक्झिबिशन सेंटर, गोरेगाव, मुंबई**
**प्रवेश : विनामूल्य**
**अधिक माहिती आणि नोंदणीसाठी, कृपया संपर्क:**
**91 98216 49948 / 91 9769216335**

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.